भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सायकांळ)

जा.क्र. ५०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१३/०८/२०१६.

१) क्षुल्लक कारणावरुन मारहान व जखमी केले. :–

दिनांक १२/०८/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील फिर्यादीने आरोपीस वनक्षेत्र प्रतीबंधक जागेवर फोटो काढण्यास मनाई केली असता आरोपीने आदेशाचे पालन न करता मानवी जिवीतास धोका पोहचेल या उद्येशाने फिर्यादीचे पायावरुन चार चाकी वाहन क्र. एमएच ३१ एजी ४४४३ नेवुन किरकोळ जखमी केले व सरकारी वाहनाचे नुकसान केले. असे फिर्यादी सुरज प्रभाकर गोखले वय ४० वर्ष, रा. शास्त्री वार्ड गणेशपुर भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८८,३२३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०८/०८/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ऑटो क्र. एमएच ३१ झेड ७६८४ ही सार्वजनीक ठिकाणी रस्त्यावर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका पोहचेल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

३) औषधोपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :–

दिनांक १२/०८/२०१६ रोजी १७.३० वा. दर. मृतक सौ. रेखा धनराज मोहनकर वय ३९ वर्ष, रा. पिपंळगाव निपाणी ही आपल्या शेतावर निंदा काढण्यास गेली असता बांधीत बेशुध्द स्थितीत पडली असता तीला औषधोपचारा करीता कोंढा येथे नेत असता रस्त्यात मरण पावल्याने फिर्यादी ज्ञानेश्वर गणपत मोहनकर वय २९ वर्ष, रा. पिपंळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

(श्री.एस. टी. घुसर)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.